THANE POLICE COMMISSIONERATE

जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर

P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY

Address- Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalawa Bridge, Thane West Maharashtra -400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819028279

प्रेसनोट

'' ठाण्यातील व्यावसायीकाकडून २,००,०००/- रू. खंडणी मागणा-या दोन इसमांना गुन्हे शाखे कडून अटक ''

गुन्हे शाखा, घटक ५ वागळे, ठाणे येथे गौरव स्विट्स दुकानाचे मालक/व्यावसायीक विरल भानजी पटेल, यांच्याकडे दोन इसम ५,००,०००/-रू. खंडणीची मागणी करीत असलेबाबत तक्रारी अर्ज प्राप्त होता. सदर अर्जाचे चौकशी मध्ये दोन इसम हे व्यावसायीक विरल पटेल, यांचेकडे खंडणी मागत असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर गुन्हे शाखा, वागळे युनिट ५, ठाणे कडुन वसंत विहार शाळेसमोरील चौक, ठाणे येथे सापळा रचून आरोपीत नामे १) सुशांत संजय सुर्वे, वय ३० वर्षे, व्यवसाय एजंट, रा. १२०३, ऑलिवीया वेरीटॉन, बी.विंग, मानपाडा, ठाणे (प.) २) अक्षय जयंत करंजवकर, वय ३५ वर्षे, व्यवसाय एजंट, रा. ६०२, सौरभ टॉवर, कोलबाड रोड, प्रताप सिनेमा जवळ, ठाणे (प.) यांना व्यावासायीक विरल पटेल यांच्याकडून तडजोडीअंती २,००,०००/- रूपये खंडणी घेतांना दि.१३/०३/२०२६ रोजी रंगेहाथ पकडलेले आहे. त्यांचे विरूध्द चितळसर पो.स्टे येथे गु.र.नं. गु.रं.नं. ८६/२०२६ भारतीय न्याय संहिता ३०८(२),३(५) अन्वेय गुन्हा दाखल केला असुन दोन्ही आरोपीतांना दि.१६/०३/२०२६ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनिरी पल्लवी ढगेपाटील, गुन्हे शाखा, घटक ५, वागळे, ठाणे या करीत आहेत.

सदरची कारवाई मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. डॉ. पंजाबराव उगले, पोलीस उप आयुक्त (आ.गु.शा/ अति.कार्यभार गुन्हे शाखा) श्री. पराग मणेरे, मा. सहा. पोलीस आयुक्त (शोध १ गुन्हे) श्री.शेखर बागडे, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक ५, वागळे, ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सलील भोसले, सपोनि पल्लवी ढगेपाटील, पोहवा/२९५५ विनायक जगताप, पोहवा/३६३३ संदिप शिंदे, पोहवा/१४७९ हर्षद तारी, पोना/४१२१ सचिन बंडगर या पथकाने केली आहे.

---ooo---